# SOUVENIR

## ONE DAY NATIONAL CONFERENCE

# Article 370 : Reality and Future




9 September 2019

## Bharatiya Mahavidyalaya, Amravati

&

## Maharashtra Political Science and Public Administration Conference

# BHARTIYA MAHAVIDYALAYA AMRAVATI

**NAAC CGPA 2.95**

# NATIONAL CONFERENCE ON

## Article 370 : Reality and Future

**9 September 2019**

**Editor**
**Dr.Prashant Vighe**

**In Collaboration with**
**Bhartiya Mahavidyalaya, Amravati**
**&**
**Maharashtra Political Science and Public Administration conference**

| | | |
|---|---|---|
| 20) | भारतीय संविधान कलम – 370<br>डॉ. गजानन मा. ढवळी | 47 |
| 21) | जम्मू काश्मीर समस्येची ऐतीहासीक पार्श्वभूमी आणि ३७० कलमाचे वास्तव विश्लेषण<br>प्रा.डॉ. प्रमोद चव्हाण | 48-49 |
| 22) | जम्मु काश्मिरची सामाजीक आर्थीक विशयाची प्रासंगिता<br>डॉ. सचिन एस. जयस्वाल | 50-51 |
| 23) | भारतीय संविधान आणि कलम 370<br>प्रा. डॉ. अनिता ज. तिडके | 52-54 |
| 24) | भारतीय संविधानातील अनुच्छेद ३७0<br>डॉ. वासुदेव वा. भगत भाऊसाहेब ज्ञानप्रकाश लहाने | 54-56 |
| 25) | भारत – पाक संबंध आणि जम्मू–काश्मिर विवाद<br>डॉ. ए. डी. जाधव | 56 |
| 26) | जम्मू काश्मिर दहशतवाद एक जटिल समस्या<br>प्रा. डॉ. अरुण मुकुंदराव शेळके | 57-59 |
| 27) | कलम ३७0 : इतिहास आणि वास्तव<br>डॉ. माया एस. वाटाणे | 60-63 |
| 28) | जम्मू काश्मीर आणि संयुक्त राष्ट्रसंघ<br>डॉ. पंकज पं नंदेश्वर | 63-64 |
| 29) | कलम 370 : वास्तव व भविश्य<br>प्रा. डॉ. प्रदिप टी. वाकोडे | 65-67 |
| 30) | भारतीय संविधानातील 370 वे कलम व सामाजिक स्थिती<br>डॉ.आर. डी. इंगोले | 67-69 |
| 31) | भारतीय संविधानातील कलम ३७० : न्यायीक विश्लेषण व प्रभाव<br>प्रा. डॉ. आर. जी. सुरळकर | 70-72 |
| 32) | जम्मु . काश्मीर प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभुमी<br>प्रा. डॉ.आर.के. काळे | 72-75 |
| 33) | कलम ३७० आणि काश्मीर<br>प्रा. डॉ. सुनील भा. चकवे | 76-77 |
| 34) | कलम ३७० आणि भारतीय राजकीय व्यवस्था<br>प्रा.विलास एस. टाले | 78-80 |
| 35) | कलम 370 आणि जम्मू.काश्मीरचे राजकारण<br>डॉ. विमल विनोद राठोड | 81-85 |
| 36) | जम्मु–काश्मिर आणि 370 वे कलमाचा इतिहास<br>सहा.प्रा.नासीर कासम शेख, कु.कोमल गजानन शिरडकर | 86-88 |
| 37) | जम्मू–काश्मिर समस्या – अनुच्छेद 370 रद्द व परिणाम<br>प्रा.रामचंद्र डो. वरघट | 88-89 |
| 38) | जम्मू काश्मीर समस्येची : ऐतिहासिक पार्श्वभूमी<br>डॉ. प्रमोद एम. तालन | 90-91 |
| 39) | जम्मू काश्मिरची ऐतिहासिक पार्श्वभूमी व काश्मिर समस्या<br>प्रा. आशिष गजानन थुल | 92-95 |
| 40) | भारतीय संविधान आणि अनुच्छेद ३५ अ<br>प्रा.डॉ.व्ही.एच.भटकर | 96-97 |
| 41) | भारतीय संविधान आणि कलम ३७० – एक चिंतन<br>प्रा.लक्ष्मण एफ. शिराळे | 97 |

**संदर्भ :**

1. Report of the drafting Committee, Shrinagar, Jammu and Kashmir Constituent Assembly, 1956.
2. Report of the Basic Principles Committee on Fundamental Rights and Citizenship, Jammu and KashmirConstituent Assembly, 1954.3. Jammu and Kashir Constituent Assembly Diabetes.
4. Jammu and Kashmir Goverment Gazettes.
5. Jammu and Kashmir Permanent Resident (Disqualification) Bill, 2004.
6. Report of the Joint Select Committee on Indian Constitutional Reforms, 1934.
7. India Government Gzaettes.
8. The Constitution of Jammu and Kashmir - Justice A. S.Anand.
9. History of Kashmir- A. K. Noorani
10. The Kashmir Issue- Abdullah Sheikh Muhammad.
11. Dainik Loksatta Date : 09/08/2019
12. Dainik Sakal Date : 06/08/2019

# जम्मु - काश्मीर प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभुमी

**प्रा. डॉ.आर.के. काळे**

सहा.प्रा.तथा विभाग प्रमुख राज्यशास्त्र विभाग

बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना :**

भारत स्वतंत्र्य झाल्यापासुन ते आज तागायत अनेक समस्या व भयावह प्रश्नांनी त्रस्त त्यामुळे भारताच्या समग्र विकासावर त्याचे दुश्परिणाम होतांना दिसतात. अशा अनेक प्रश्नांपैकी एक प्रश्न म्हणजे काश्मीर प्रश्न होय या प्रश्नामध्ये भारताचे परराश्ट्र धोरण व भारत – पाक संबंधावर त्याचे दुर्गामी परिणाम झालेले आहे. भारत – पाक संबंधांच्या दृश्टीने अतिशय कठीण बनलेल्या काश्मीर प्रश्नामुळे भारतातील एकात्मतावादी शक्ती आणि फुटीर शक्ती यांच्यामध्ये सतत संघर्श होत राहिल्याने भारताला एका अंतर्गत समस्येला सातत्याने तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे जम्मु काश्मीर मधील नागरीकांच्या हक्कांची पायमल्ली सातत्याने होतांना दिसते. दुहेरी नागरिकत्व, विशेश राज्याचा दर्जा, वेगळे संवीधान यामुळे तेथील सामान्य नागरीकांना आपण अखंड भारताचा एक भाग आहोत असे कधी वाटलेच नाही. त्यातल्या त्यात पाकव्याप्त काश्मीरमध्ये दहशतवादी कारवायांनी भारताच्या राश्ट्रीय एकात्मतेला तडे देण्याची एकही संधी सोडली नाही. त्यामुळे हा प्रश्न कायमचा निकाली लागावा म्हणून संविधानातील कलम 370 रद्द केले गेले. प्रस्तुत शोध निबंधामध्ये जम्मु काश्मीर प्रश्नांची ऐतीहासीक पार्श्वभुमी, तेथील राजकारण व समस्येची सोडवणुक या संबंधी उवापोह केला आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभुमी :**

**अ) भारताच्या धर्मनिरपेक्षतेचे प्रतीक :**

या वादातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे काश्मीर हे भारताच्या धर्मनिरपेक्षतेचे प्रतीक आहे आणि कसोटीही आहे. जर 1947 मध्ये काश्मीर पाकिस्तानात सामील झाले असते तर भारतीयांनी जराही विचलित न होता या वस्तुस्थितीचा स्वीकार केला असता; परंतु जेव्हा पठणी टोळया आणि पाकिस्तानच्या सैन्याने काश्मीरवर आक्रमण केले तेव्हा काश्मीरचे लोकप्रिय नेते शेख अब्दुल्ला काश्मीरच्या भारतातील विलीनीकरणास अनुकूल बनले. जम्मू– काश्मीरचे भारतात विलीनीकरण झाले, त्यामुळे आता परिस्थिती वेगळी आहे. काश्मीरमध्ये मुस्लिम बहुसंख्य आहेत म्हणून पाकिस्तानने काश्मीरवर आपला हक्क आहे असा दावा केला. परंतु द्विराश्ट्रवादाचा सिद्धान्त न स्वीकारणाऱ्या धर्मनिरपेक्ष भारताला हा दावा मान्य नव्हता. कारण भारताच्या दृश्टीने आपल्या प्रदेशाचा एक छोटा भाग आपल्या ताब्यात ठेवण्यापुरता हा प्रश्न मर्यादित नसून तो भारतीय राज्य आणि

समाजाच्या मूलभूत प्रकृतीलाच आव्हान देतो.

नेहरू आणि अन्य भारतीय नेत्यांना हे स्पश्ट दिसत होते की, काश्मीर भारतापासून वेगळा काढल्यास भारताच्या धर्मनिरपेक्षतेला गंभीर धोका पोहोचेल. धर्माच्या नावाखाली काश्मीर भारतातून फुटले तर द्विराश्ट्रवाद सिद्धान्ताचे समर्थनच केल्यासारखे होईल. त्यामुळे हिंदू जातीयवादी शक्ती बळकट होतील आणि भारतात पाकिस्तानपेक्षाही जास्त संख्येने राहणाऱ्या कोटयवधी मुस्लिमांना असुरक्षित वाटेल; त्यांचे भारतातील वास्तव्य असमर्थनीय ठरू शकेल. ही परिस्थिती पुश्कळ अभारतीय विद्वानांच्या लक्षात आली होती. संयुक्त राश्ट्राच्या भारत आणि पाकिस्तानवरील आयोगाचे सभासद जोसेफ कोर्बेल यांनी 1954 मध्ये लिहिले होतेः ''काश्मीर तंटयाशी संबंधित असा सर्व कडवटपणा आणि रक्तपात, सर्व विखारी भाशणे, हटवादीपणा आणि संशय इत्यादींचे खरे कारण म्हणजे तडजोडीला नकार देणारा दोन जीवनपद्धतींमधील संघर्श आणि राजकीय संघटनांबद्दलच्या दोन संकल्पना, जीवनमूल्यांनी दोन परिमाणे, दोन परिमाणे, दोन आध्यात्मिक दृश्टिकोन यांच्यामधील जीवघेणा संघर्श होय. काश्मीर या सर्वांचे प्रतीक आणि युद्धभूमी दोन्हीही आहे.''

भारतीय स्वातंत्र्यानंतऱ्यानंतर ऑक्टोबर, 1947 मध्ये काश्मीर भारतात सामील झाल्यावर लगेचच भारताने काश्मिरींना आंतरराश्ट्रीय संघटनेच्या देखरेखीखालील सार्वमताने अंतिम निर्णय घेण्याची संधी दिली होती; परंतु सार्वमत घेण्यापूर्वी पाकिस्तानने आपले सैन्य काश्मीरबाहेर नेले पाहिजे, अशी अट घातली होती. योग्य परिस्थितीत सार्वमत घेतले तर सार्वमताच्या निर्णयास बांधील राहण्यास सन 1953 पर्यंत भारत तयार होता; परंतु पाकव्याप्त काश्मीरमधून आपले सैन्य मागे घेण्यास पाकिस्तानने नकार दिल्यामुळे आणि भारत–पाक संबंध शीतयुद्धात अडकल्यामुळे सार्वमत घेता आले नाही. 1953–54 मध्ये अमेरिकेने पाकिस्तानशी लश्करी करार केल्यामुळे पाकिस्तानला 'द्वेश आणि शत्रुत्व' यांवर आधारित 'तडजोडशून्य आक्रमक दृश्टिकोन' बाळगण्यास उत्तेजन मिळाले.

1956 च्या शवेटी भारत सरकारने पाकिस्तान आणि आंतरराश्ट्रीय समुदायास असे स्पश्ट केले की, काश्मीरमधील परिस्थिती आणि भारत–पाक संबंध इतके पूर्णपणे बदलले आहेत की, सार्वमतास असलेला भारताचा देकार आता कालबाहय झाला आहे; काश्मीरचे भारतामधील सामीलीकरण हेच आता अंतिम सत्य आहे. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे. असे असले आणि उघड उच्चार केला जात नसला तरी नेहरू आणि त्यांचे वारसदार 'जैसे थे' परिस्थिती म्हणजेच युद्धतहकुबी रेशेला किंवा प्रत्यक्ष नियंत्रणरेशेला कायमची आंतरराश्ट्रीय सरहद्द मानण्यास तयार राहिले आहेत.

ब) जम्मू आणि काश्मीरला विशेश दर्जा :

ऑक्टोबर, 1947 मधील सामीलीकरणाच्या करारानुसार जम्मू आणि काश्मीर राज्यास भारतीय राज्यघटनेच्या 370 व्या कलमानुसार एक तात्पुरता विशेश दर्जा देण्यात आला. त्या राज्याने संरक्षण, परराश्ट्र व्यवहार आणि दळणवळण यांचे अधिकार भारताच्या संघराज्याकडे सोपविले आणि बाकी सर्व बाबतींत आपल्याजवळ स्वायत्तता ठेवली. त्या राज्याला स्वतःची वेगळी घटना–समिती आणि घटना ठेवण्यास, 'सदर–इ–रियासत' या राज्यप्रमुखास निवडून देण्यास आणि स्वतःचा राश्ट्रध्वज बाळगण्यास परवानगी देण्यात आली. त्याच्या मुख्यमंत्र्यास 'पंतप्रधान' असे संबोधण्यात आले. याचा असाही अर्थ होता की, भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकारविशयक प्रकरण त्या राज्याला लागू नव्हते. तसेच त्या राज्यात सर्वोच्च न्यायालय, निर्वाचन आयोग आणि महालेखा परीक्षक या घटनात्मक संस्थांनाही अधिकार क्षेत्र नव्हते. अथवा, जम्मु–काश्मीर राज्य त्यांच्या अधिकारकक्षेत येत नव्हते. तथापि, 370 व्या कलमाचा संबंध केंद्र आणि राज्य यांच्यातील नात्याशी होता; पूर्ण प्रक्रिया झालेल्या सामीलीकरणाशी नव्हता.

1956 मध्ये जम्मू आणि काश्मीरच्या घटना – समितीने भारतातील सामीलीकरणास मान्यता दिली. मागील काही वर्शांत राज्याच्या विशेश दर्जात पुश्कळच सुधारणा झाल्या आहेत; किंबहुना, तो संपल्यातच जमा आहे. सर्वोच्च न्यायालय, महालेखा परीक्षक आणि विर्चिन आयोग यांचे अधिकारक्षेत्र आणि मुलभूत अधिकाराच्या तरतुदी आता जम्मू–काश्मीरलाही लागू करण्यात आल्या आहेत. संसदेला त्या राज्यासाठी कायदे करण्याची सत्ता दिली गेली असून राश्ट्रपतींच्या अधिकारकक्षेतील राश्ट्रपती राजवटीसह सर्व अधिकार राश्ट्रपती आता जम्मू–काश्मीरमध्ये राबवू शकतात. राज्याच्या सेवा आता संघराज्य सेवेशी आणि अखिल–भारतीय सेवांशी जोडल्या आहेत. सदर–इ–रियासतचे 'राज्यपाल' आणि पंतप्रधानाचे

'मुख्यमंत्री' असे नामकरण करण्यात आले आहे.

राज्याच्या स्वायत्ततेच्या तरतुदींवर अशा प्रकारे होत असलेल्या अतिक्रमणाचा, काश्मिरी लोकांमधील एका मोठ्या गटाने निशेध केला; तर दुसऱ्या बाजूला 370 व्या कलमानुसार काश्मीरचे पूर्ण सामीलीकरण व्हावे, राज्याच्या शासकीय सेवांमध्ये जम्मूला अधिक वाटा मिळाव, एवढेच नव्हे तर जम्मूला काश्मीरपासून वेगळे काढावे यासाठी जम्मूमध्येएका प्रखर चळवळीस सुरूवात झाली.तिला लवकरच जातीय रंग मिळून बहुसंख्य मुस्लिमांचे काश्मीर आणि बहुसंख्य हिंदूचे जम्मू अशा धार्मिक पातळीवर राज्याचे विभाजन होण्याचा धोका निर्माण झाला. या चळवळीचे नेतृत्व करणारी जम्मू–प्रजा–परिशद पुढे जनसंघात विलीन झाली. त्यानंतर जनसंघाने हे आंदोलन राश्ट्रीय पातळीवर नेले. एक दुर्दैवी घटना म्हणजे जनसंघाचे अध्यक्ष श्यामप्रसाद मुखर्जी यांचे 23 जून, 1951 रोजी श्रीनगरच्या तुरूंगात हृदयविकाराने निधन झाले. शासनाच्या आज्ञेविरूद्ध ते या राज्यात गेले होते; म्हणून त्यांना तुरूंगात ठेवण्यात आले होते. प्रजा परिशदेच्या चळवळीमुळे काश्मीरमधील पकिस्तानधार्जिण्या घटकांचा फायदा झाला. भारताच्या धर्मनिरपेक्ष प्रतिमेला धक्का लागला आणि काश्मीर प्रकरणातील भारताची बाजू कमकुवत झाली. शेख अब्दुल्लाही व्यथित झाल्याने त्यांना भारताच्या धर्मनिरपेक्षतेबद्दल शंका वाटू लागली.

क) शेख अब्दुल्लांची निती :

भारताच्या काश्मिर विशयक समस्यांना शेख अब्दुल्लापासुन सुरूवात झाली. काश्मीर खोऱ्यातील जातीवादयांनी पाकीस्तानमध्ये सामील होण्यासाठी दबाव आणला आणि जम्मूमधील जातीवादयांनी भारतात पूर्णपणे विलीन होण्याची मागली केली. म्हणुन शेख अब्दुल्ला आता वेगळया राज्याचा विचार करू लागले. त्यासाठी त्यांनी जातीय शक्तींचे सामर्थ्य आणि भारतातील धर्मनिरपेक्षतेचा कमकुवतपणा यांना अवास्तव महत्त्व देऊन काश्मीरला संपुर्ण स्वायत्तता हवी, अशी भाशा सुरू केली. त्यासाठी अमेरिका आणि अन्य परकिय सत्तांची मदत घेऊन काश्मिरचे स्वातंत्र्य मिळवू असे घोशित केले. परिणामी पं. नेहरू यांनी संयमी भुमिका बाळगावी अशी विनवणी केली. पण उपयोग झाला नाही. म्हणुन अब्दुल्लांना बडतर्फ करून त्यांच्या जागी बक्षी गुलाम महंमद यांना नेमण्यात आले.

बक्षी गुलाम महंमद यांच्या कारभारात मोठया प्रमाणावर भ्रश्टाचार आणि शासकीय यंत्रणेचा दुरूपयोग होत होता. त्यांच्या पाठोपाठ जी.एम. सादिक आणि मीर कासीम प्रमाणिक होते. परंतु कार्यक्षम व कुशल राजकारणी नसल्याने त्यांचे शासन लोकप्रिय झाले नाही. सन 1971 मधील बांगला देश युद्धाचा आणि पाकीस्तानच्या फाळणीचा काश्मीरवर लक्षणीय प्रभाव पडला. अब्दुल्लांनी ही पुनर्विचार करून आपले मत बदलले आणि केंद्र शासनाशी तडजोड केली. इंदिरा गांधींनी मित्रत्वाचा हात पुढे केला. सन 1975 मध्ये अब्दुल्ला पुन्हा मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते बनले. 1982 मध्ये त्यांचा मृत्यु झाल्यानंतर त्यांचे चिरंजीव फारूख अब्दुल्ला मुख्यमंत्री बनले.

ड) फारूख अब्दुल्लांचे राजकारण :

1982 पासून काश्मीरमध्ये फारूख अब्दुल्लांची तरी सत्ता आहे किंवा राश्ट्रपतींची राजवट तरी आहे. जून, 1983 च्या मध्यावधी निवडणुकांत फारूखना पुरेसे बहुमत मिळाले; परंतु लवकरच ते आणि केंद्र शासन यांच्यामध्ये कटू संबंध निर्माण झाले. जुलै, 1984 मध्ये काश्मीरमधील राजवट बदलण्याचा जोरदार प्रयत्न केला गेला. फारूख यांचे मेहुणे जी.एम. शहांची नेमणूक केली. जी.एम. शहा भ्रश्टाचारी असल्यामुळे त्यांना काश्मीरी पंडीतांवर जातीयवाद्यांकडून होत असलेले हल्ले कमी करता आले नाही. म्हणून 1986 मध्ये त्यांचे शासन बरखास्त करण्यात आले आणि शेवटी सन 1996 मध्ये निवडणुका झाल्या. यामध्ये फारूक अब्दुल्ला यांनी निवडणुका जिंकल्या आणि त्यांचे पुनरागमन झाले.

अलीकडच्या काळात काश्मीरच्या स्वातंत्र्याची मागणी करणारी ऑल पार्टी हुरियत कॉन्फरन्स, जेकेएलएफ आणि पाकिस्तनधार्जिणे मुजाहिदिन यांचा जोर कमी झाला आहे. याचे मुख्य कारण मुजाहिदिन आणि जेकेएलएफच्या दहशतवाद्यांनी आपल्याच लोकांची लुटालुट केली; परंतु पाकिस्तानने पाठिंबा देऊन संघटित केलेला दहशतवाद अद्यापतही धोकादायक असून जम्मू आणि काश्मीरमधील नित्याच्या राजकारणावर विपरीत परिणाम करत आहे.

➢ समस्येची सोडवणूक :

पन्नासच्या दशकापासून आतापर्यंत काश्मीर कित्येक दुर्दैवी घटनांनी इतके उद्ध्वस्त झाले आहे की, तेथील

लोकांची राज्यकर्त्यांपासून आणि संपूर्ण भारतापासूनही फारकत झाली आहे; तेथे चांगल्या आणि कणखर शासनाची उणीव आहे. तसेच शासनाची अनेक खाती भ्रश्टाचार आणि वशिलेबाजीच्या दलदलीत रुतली आहेत. 1951 च्या पहिल्या निवडणुकीपासून बहुतेक सर्व निवडणुकांत भ्रश्टाचार आणि लबाडी झाली आहे; त्यामुळे निवडणूक प्रक्रिया आणि एकंदर राजकीय व्यवस्थेतील लोकांचा विश्वास उडाला आहे; म्हणून ते घटनाबाह्म साधनांकडे वळू लागले आहेत. तसे पाहिले तर या राज्यातील लोकशाहीचा कारभार प्रथमपासूनच दोशपूर्ण आहे आणि राज्याचे राजकारण आणि प्रशासन हुकुमशाही स्वरूपाचे आहे. पाकिस्तानने पुरस्कृत केलेली बंडखोरी आणि दहशतवाद फोफोवल्यावर काश्मीरमधील मानवी हक्क धोक्यात आले आहेत. पाकिस्तानचा लश्करी धोका आणि बंडखोरी लक्षात घेतली तर आपल्या सैन्याला काश्मीरमध्ये मोठ्या संख्येने तैनात करणे आवश्यकतच आहे; परंतु नागरी स्वातंत्र्याची हमी देणाऱ्या राज्यव्यवस्थेस अशा प्रकारे सैन्य तैनात करावे लागणे म्हणजे एक प्रकारे नागरी स्वातंत्र्याच्या मूल्यांचीच किंमत मोजणे होय.

केंद्र शासनाचा वारंवार होणारा हस्तक्षेप, राजकीय सौदेबाजी, आधीची शासने बरखास्त करून त्यांच्या जागी तशाच अकार्यक्षम आणि भ्रश्ट मंत्र्यांना नेमणे आणि राश्ट्रपतींची राजवट वरचेवर लादणे या कारणांमुळे काश्मीरमध्ये जवळजवळ कायमची अस्थिरता आहे. परिणामतः काश्मिरी लोक केंद्राने पाठिंबा दिलेल्या शासनकर्त्यांना कळसूत्री बाहुल्या मानतात आणि राज्यपालांना केंद्र शासनाचे हस्त समजतात.

पाकव्याप्त काश्मीरवर पुन्हा नियंत्रण मिळविणे संभाव्य नसले तरी जम्मू–काश्मीरचे भारतातील सामीलीकरण अपरिवर्तनीय आहे. दहशतवाद आणि बंडखोरीविरूद्ध कडक कारवाईची गरज आहे, हे स्पश्ट असले तरी या कृतीमुळे लोकांचे नागरी स्वातंत्र्य आणि मानवी अधिकार यांवर विपरीत परिणाम होऊ नये. भारत–पाकिस्तानच्या बिघडलेल्या संबंधांची काळीकुट्टछाया जम्मू आणि काश्मीरवर पडणे अपरिहार्य आहे; तशी ती पडत राहणारच आहे. म्हणूनच, पोलीस आणि निमलश्करी दलांच्या जुलमांपासून मुक्त असे स्वच्छ आणि कार्यक्षम लोकशाही शासन काश्मीरला देणे अधिकच आवश्यक आहे.

स्थानिक स्वायत्तता किती प्रमाणात असावी, हा एक विवाद्य मुद्दा आहे. तो काश्मीरमधील लोकांच्या भावना आणि भारताच्या संघराज्यात्मक राज्यघटनेची चौकट समोर ठेवूनच सोडवावा लागेल. तथापि, आमच्या मते लोकांचा पूर्ण सहभाग असलेली लोकशाही प्रक्रिया कशी विकसित होते, हा जास्त महत्त्वाचा प्रश्न आहे. दोन्ही महत्त्वाच्या बाजूंचा विचार केला तर काश्मीरचा प्रश्न सोडविणे कठीण नाही. कोणतीही लोकशाही आपल्या राज्याच्या एखाद्या भागाला फुटून निघण्याची परवानगी सहजासहजी देणार नाही; तसेच कोणत्याही लोकशाहीला आपल्या लोकांचया इच्छांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष करणेही परवडणार नाही. म्हणून या समस्येची सोडवणुक करणे क्रमप्राप्त होते.

थोडक्यात वर्तमान अवस्थेमध्ये केंद्र सरकारने 370 कलम रद्द करून केंद्रशासनाचा दर्जा बहाल केला. या निर्णयामुळे जम्मु काश्मिर मधील नागरीकांचे दुहेरी नागरीकत्व रद्द होऊन एकेरी नागरीकत्व सर्वांना बहाल करण्यात आले. काश्मीरचा विशेश दर्जा या दृश्टीने रद्द झाला जम्मु काश्मीर मधील अन्याय हिंसाचार थोपवण्यास मदत होऊन दहशतवादी कारवायांना आळा बसण्यासाठी हा निर्णय महत्वाचा ठरला. तसेच तेथील नागरीकांना भारतीय संविधानातील सर्व तरतुदी लागु झाल्या आणि एकसंघ भारताच्या निर्मीतीसाठी हे कलम रद्द करणे हितावह ठरले. हि गोश्ट जरी स्वागताहार्य असली तरी ही सर्व प्रक्रिया संविधानीक मार्गाने व जम्मु काश्मीर मधील विधानसभेच्या ठरावाद्वारे पार पाडावयास हवी होती. परंतु तसे झाले नाही. बऱ्याच विचारवंतांनी या निर्णयाला अथवा वृत्तीला केंद्र सत्तेचे आक्रमक रूप म्हणून अवहेलना देखील केली आहे.

**संदर्भ :**


1. State Government of India – Maheshwari S.R.
2. India After Independence-Bipin Chandra
3. लोकसभा निवडणुका 1952 ते 1999 – य. दि. फडके.
4. The Politics of Defection – Subhash Kashap.
5. Politics in India - C.P. Bhamri.
6. भारताचे स्वातंत्र 50 वर्शाचा मागोवा – भा.ल. भोळे.
7. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण – भा.ल. भोळे.